मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मौजे चऱ्होली येथील प्रस्तावित TP Scheme रद्द!

## भूमिपुत्रांच्या एकजुटीचा विजय; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मौजे चऱ्होली येथे प्रस्तावित केलेली TP SCHEME अखेर रद्द करण्यात आली. प्रशाससनाने आज तशी घोषणा केली आणि आगामी सर्वसाधारण सभेत त्या प्रस्तावाला मंजुरी देऊन 'नोटिफिफकेशन' काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांच्या एकजुटीचा विजय झाला असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश मिळले आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. प्रशासनाने मौजे चिखली आणि चऱ्होलीसह शहरातील काही गावांमध्ये TP SCHEME राबवण्याची योजना आखली होती. स्थानिक भूमिपुत्र आणि नागरिकांना विश्वासात न घेता ही SCHEME लादण्याचा प्रयत्न सुरू होता. या TP SCHEME ला तीव्र विरोध करण्यात आला.

दरम्यान, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी या TP SCHEME विरोधात रान पेटवले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत तीन बैठका घेतल्या. शहराच्या स्थापनेपासून भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. सुरूवातीला एमआयडीसीए, त्यानंतर नवनगर प्राधिकरण आणि महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतरही विविध आरक्षणांसाठी शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या आहेत. आता TP SCHEME च्या माध्यातून शेतकरी भूमिहीन होतील. त्यामुळे आमचा TP SCHEME ला तीव्र विरोध आहे. तसेच, संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (DP) तयार होत असताना TP SCHEME चा आग्रह कशासाठी? असा प्रश्नही आमदार लांडगे यांनी उपस्थित केला होता.

भूमिपुत्रांची एकजुट आणि आमदार महेश लांडगे यांची साथ यामुळे मौजे चिखली येथील TP SCHEME रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. त्यानंतर मौजे चऱ्होलीची TP SCHEME रद्द करण्यासाठी महापालिका भवनासमोर आंदोलन करण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांची बैठक झाली आणि शुक्रवारी, दि. 30 मे रोजी चऱ्होली बंदची हाक दिली होती. माजी महापौर नितीन काळजे, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांच्यासह ग्रामस्थांनी वज्रमुठ बांधली होती. विशेष म्हणजे, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिपुत्रांच्या हितासाठी निर्णय घ्यावा लागेल, अशी मागणीही केली. त्यामुळे महापालिका प्रशासनाने नमते घेतले आणि चऱ्होलीची TP SCHEME रद्द करण्यात येणार आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मौजे चऱ्होली येथील प्रस्तावित TP SCHEME सुरू केलेल्या प्रक्रियेला स्थगिती दिली. भूमिपुत्र आणि आमदार महेश लांडगे यांनी सदर TP SCHEME ला विरोध केला आहे. त्यामुळे प्रक्रिया स्थगित करीत आहोत. तसेच, प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन TP SCHEME रद्दबाबत निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात येईल.

> “ माझ्या गेल्या 20 वर्षांतील सामाजिक व राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू म्हणून पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्र राहीला आहे. त्यामुळे भूमिपुत्रांच्या हिताबाबत कोणतीही तडजोड नाही, अशीच माझी भूमिका आहे. चिखली आणि चऱ्होली दोन्ही गावातील TP Scheme रद्द झाली. तसे नोटिफिशेन लवकरच काढण्यात येईल. महानगरपालिका प्रशासनाचे मनापासून आभार मानतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत पाठबळ दिले. शास्तीकर सरसकट माफी असो, प्राधिकरण परतावा आणि बफर झोन रद्द करण्यासारखे निर्णय भाजपा महायुती सरकारने घेतले. या पुढील काळातही भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम आग्रही राहणार आहे.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# गंगोत्री पार्कमध्ये पावसाळी वाहिनीचे काम सुरू

## महापालिकेद्वारे पावसाळी वाहिनीसह सांडपाणी वाहिनी टाकण्याचे काम सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिघी रस्त्यावरील गंगोत्री पार्कमध्ये महापालिकेद्वारे पावसाळी वाहिनीसह सांडपाणी वाहिनी टाकण्याचे काम सुरू झाले आहे. या कामासाठी १५ दिवस रस्ता वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. दरम्यान, हे काम पूर्ण झाल्यावर रस्त्याचे डांबरीकरण करण्याचीही मागणी नागरिकांनी केली आहे.

भोसरीतील दिघी रस्त्यावरील गंगोत्री पार्कमध्ये पावसाळी वाहिनीच टाकण्यात आली नसल्याचे पावसाचे पाणी गटारांमधून वाहत होते. मात्र, सांडपाण्याच्या वाहिनीची क्षमता कमी असल्याने पावसाचे व गटाराचे पाणी बाहेर रस्त्यावरून वाहत होते. त्याबाबतचे वृत्त 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झाल्यावर त्याची दखल घेत गुरूवारी (ता. २९) पावसाने उघडीप दिल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेद्वारे या रस्त्यावर पावसाळी वाहिनीबरोबरच सांडपाणी वाहिनी टाकण्याचे काम सुरू केले. त्यामुळे नागरिक आणि



वाहन चालकांद्वारे समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

दिघीतील ज्येष्ठ नागरिक विजय जिरेसाळ म्हणाले, “महापालिकेने पावसाळी वाहिनी टाकल्यावर रस्त्यावर वाहणाऱ्या पाण्यापासून वाहन चालकांची सुटका होणार आहे. याचा आनंद आहे. मात्र रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचे डांबरीकरणही महापालिकेने केले पाहिजे. जेणेकरून आमच्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांना रस्त्याने प्रवास करणे सोयीचे होईल.”

> “ गंगोत्री पार्कमधील रस्त्यावर स्थापत्य विभागाद्वारे नऊशे मिलीमीटर व्यासाची पावसाळी वाहिनी तर जलनिस्सारण विभागाद्वारे सहाशे मिलीमीटर व्यासाची सांडपाणी वाहिनी टाकण्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली आहे. यासाठी १५ दिवस रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्याबाबत भोसरी वाहतूक पोलिसांची परवानगी मिळाली आहे. मात्र, हे काम त्या अगोदरच पूर्ण करण्यात येईल.
>
> **- राजेंद्र डुंबरे, उपअभियंता, जलनिस्सारण विभाग, 'ई' क्षेत्रिय कार्यालय.**

# फुले स्मारक विस्तारीकरणासाठी सर्वेक्षण सुरु

## मिळकतींमध्ये 516 मालक असून, 285 भाडेकरू : सर्वांचे पुनर्वसन केले जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

गंज पेठेतील महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारक या दोन्ही वास्तू एकत्रित करून त्याचे विस्तारीकरणाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी राज्य सरकारने निधीदेखील उपलब्ध करून दिला आहे. या दोन्ही स्मारकांना जोडणाऱ्या जागा ताब्यात घेण्यात येणार आहेत. यासाठी बाधित मिळकतदारांना मोबदला कसा पाहिजे, याचे सर्वेक्षण महापालिकेने सुरू केले आहे. यातील प्रत्येकाशी चर्चा केली जाणार असून, मोबदला नक्की कसा पाहिजे, याची माहिती गोळा केली जात असल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सांगितले.



महात्मा फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारकाचे विस्तारीकरणामध्ये या भागातील ९१ मिळकती बाधित होत आहेत. याचे क्षेत्रफळ सुमारे ५ हजार ३१० चौरस मीटर आहे. या मिळकतींमध्ये ५१६ मालक असून, २८५ भाडेकरू आहेत. या सर्वांचे पुनर्वसन केले जाणार आहे. त्यांना या जागेचा मोबदला नक्की कशा पद्धतीने पाहिजे यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. फुले स्मारकाच्या विस्तारीकरणामध्ये बाधित होणाऱ्या मिळकतींसाठी योग्य तो मोबदला देण्याचा प्रयत्न महापालिकेचा असल्याचे दिवटे यांनी सांगितले.

> "महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी आवश्यक असलेले भूसंपादन तातडीने आणि प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. जागा ताब्यात घेताना बाधितांना जागांचा मोबदला कसा पाहिजे, यासाठी सध्या सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.
>
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

महात्मा फुले सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारने मान्यता दिली आहे. मात्र, महापालिका यामध्ये दिरंगाई करत असल्याची नाराजी ओबीसी समाजाचे नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी तातडीने बैठक घेत स्मारकासाठी आवश्यक असलेल्या मिळकती ताब्यात घेण्यासाठी महापालिकेचे उपायुक्त अविनाश सपकाळ यांच्याकडे जबाबदारी दिली. या कामाचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. स्मारकाच्या विस्तारीकरणामध्ये जागा जात असलेल्या काही जागामालकांनी घराच्या मोबदल्यात घर, व्यावसायिक जागेच्या बदल्यात व्यावसायिक जागा द्यावी अशी मागणी केली आहे. तर काही जणांनी रोख मोबदलादेखील मागितला असल्याचे दिवटे यांनी सांगितले.

# "माझ्या वैष्णवीची बदनामी करू नका"

## चारित्र्यावर शिंतोडे उडाल्याने वैष्णवीच्या आजोबांची प्रकृती खालावली; कस्पटे कुटुंबीय व्यथित

**पुणे | प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात हगवणे यांचे वकील विपुल दुशांकी यांनी वैष्णवीच्या चारित्र्यावर अजब वक्तव्य केले आहे. तीचे नको ते चॅट सुरु होते. नको त्या व्यक्तीसोबत ती बोलत होती. कानाखाली मारणे हा छळ नाही असं ते माध्यमांसमोर म्हणाले आहे. त्यांनतर या वकिलांवर टीकेचे झोड उठत आहेत. सर्वत्र समाजातून वकिलाच्या वक्तव्याचा निषेध केला जात आहे. या वक्तव्याने वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांना अश्रू अनावर झाले. माझ्या मुलीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नका अशी विनंती करत ते माध्यमांसमोर ढसाढसा रडले आहेत. वैष्णवी आत्महत्या करण्याबद्दल पाच ते सहा दिवस सातत्याने हगवणे कुटुंब मारहाण करत होते. वैष्णवी वर आता काही आरोप करत शिंतोडे उडवू नका असे त्यांनी सांगितले आहे.




अनिल कस्पटे म्हणाले, काल आरोपीचे वकील बोलले ते मी आणि समाजाने ऐकले. ते चुकीचे बोलले. असे एखाद्या मुलीच्या चारित्र्यावर बोलले हे चुकीचे आहेत. त्यांनी केलेले कृत्य माझ्या मुलीचा बळी याला वेगळी कलाटणी द्यायची आहे. मोबाईल चॅटिंग बाबत आम्हाला कल्पना दिली नव्हती. कुठलीही माहिती दिली नव्हती. माझ्या मुलीवर चारित्र्याचा संशय घेतला आहे. माझ्या मुलीचा मोबाईल काढून घेतला असं ते म्हणाले. मोबाईल काढून घ्यायचा असेल तर मी तिला मोबाईल दिला कशाला? तर आरोपी जावई याला १ लाख ५२ हजाराचा मोबाईल दिला. त्यांनी मागितला त्यानुसार आम्ही दिला. विकत घेतलेला मोबाईलची रिसीट दाखवली. आजही मी आरोपीला दिलेल्या मोबाईलचे हप्ते भरत आहे.

**लग्न मोडण्याला हगवणे कुटुंब जबाबदार**

छळ केला नाही म्हणत आहेत गाडी नाही मागितली म्हणतात. फॉर्च्यूनर देण्याअगोदर मी एमजी हेक्टर ही गाडी बुक केली होती. त्यांनी वादावादी केली. मला फॉर्च्युनर नाही दिली तर मी यांची हेक्टर पेटवून देईन असं सांगण्यात आलं म्हणून फॉर्च्युनर दिली. आरोपीकडे 5 कोटीच्या गाड्या नाहीत. याच्याकडे एकच गाडी मी दिलेली आहे. गाडी दिली नाही तर लग्न मोडेल अशी धमकी दिली होती. अगोदर दोन लग्न मोडली होती. माझ्याकडे गाडी, चांदीच्या ताटाची मागणी सोन्याची मागणी त्यांनी केली. अधिक महिन्यात इतर मागणी करण्यात आल्या. माझ्या मुलीचे दोन लग्न मोडली त्याला हगवणे कुटुंब जबाबदार आहेत.

### निलेश चव्हाण यांच्याकडे बाळ कसे गेले?

» वैष्णवीचे मामा म्हणाले, सुनेचा मृत्यू झाला हे कळल्यावर त्यांना बाळाचे सुचले कसे. निलेश चव्हाण देखील या कटात सहभागी होता. त्यावेळी तिथं तो ही तिथं होता. ज्यावेळेस कस्पटे कुटुंब बाळाला आणायला गेले. त्यावेळेस त्या ठिकाणी ते नव्हते. परत आम्हाला सांगण्यात आले. मग आमचे कुटूंब त्या बाळाला आणण्यासाठी निलेश चव्हाण याच्या घरी गेले. बाळ आणायला गेले त्यावेळेस पिस्तूल दाखवून भीती दाखवली. निलेश चव्हाण यांच्याकडे बाळ कसे गेले हा आमचा प्रश्न आहे.

### जालिंदर सुपेकर यांचा हगवणे कुटुंबाशी संबंध

» हगवणे यांनी आमच्याशी निगडीत बांधकाम व्यावसायिकाकडे पैसे मागितले होते. वकील असे बोलतात ही हास्यास्पद गोष्ट आहे. चार चापटा मारणे म्हणजे गुन्हा नाही हे वाईट आहे. आमचं जालिंदर सुपेकर यांचा काही संबंध आला नाही. मामा म्हणून सुपेकर जालिंदर अस पत्रिकेत नाव आहे. त्याचा हगवणे कुटुंबाशी संबंध आहे.

# वायसीएमची हेल्थ कार्ड यंत्रणा फेल

## महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात 2010 पासून ई-हेल्थ कार्ड प्रणाली सुरू




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी महापालिकेची पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेत सुरू असलेली हेल्थ कार्ड यंत्रणा गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे. त्याऐवजी रुग्णांना कागदावर टोकन क्रमांक दिले जात आहेत. त्याच आधारे मेडिकल रेकॉर्ड डिपार्टमेंट क्रमांक (एमआरडी नंबर) तयार केले जात आहेत. त्यामुळे रुग्णांची प्राथमिक माहिती डिजिटल पद्धतीने साठविण्यात अडचणी येत आहेत. ही यंत्रणा पुन्हा सुरू होण्यासाठी सध्या मुहूर्ताची प्रतीक्षा आहे.

महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात 2010 या वर्षापासून ई-हेल्थ कार्ड प्रणाली सुरू करण्यात आली. 2020 पासून पीव्हीसी स्मार्ट कार्ड स्वरुपातील हेल्थ कार्ड देणे बंद आहे. त्याऐवजी एका चिठ्ठीवर टोकन क्रमांक देऊन पुढील कार्यवाही होत आहे. या हेल्थकार्डवर रुग्णाचे नाव, पत्ता, रक्तगट, एमआरडी नंबर आदी नमूद केलेले होते. या प्रणालीमुळे रुग्णाची प्राथमिक माहिती समजणे सोपे होत होते. सुरुवातीला नवीन कार्ड काढताना 30 रुपये आणि नंतरच्या उपचारासाठी दरवेळी दहा रुपये केसपेपरसाठी घेतले जात होते. मात्र, कोरोना काळामध्ये 2020 पासून हेल्थ कार्ड देणे बंद करण्यात आले. आता चिठ्ठीवर टोकन क्रमांक लिहून पुढील कार्यवाही केली जात आहे.

### कशा पद्धतीने सुरू होती प्रणाली?

वायसीएम रुग्णालयामध्ये ई-हेल्थ कार्ड प्रणाली राबविली जात असताना रुग्णालयात एकदा उपचारासाठी भेट देऊन गेलेल्या रुग्णाची माहिती शोधणे सोपे होत होते. हेल्थ कार्डच्या मदतीने रुग्णालयामध्ये रुग्णाविषयीची यापूर्वी नोंदविलेली माहिती मिळत होती. त्यामुळे पुढील उपचारांसाठी त्याचा उपयोग होत होता. त्यामुळे वेळेची बचत करण्याबरोबरच पेपरलेस कारभारासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरत होती.

### .. तर तयार होतो दुसरा एमआरडी क्रमांक

हेल्थ कार्डवर रुग्णाचा युनिक नंबर असतो. त्याला एमआरडी नंबर म्हणतात. उपचारासाठी रुग्ण आल्यानंतर पहिल्यांदा केसपेपर काढावा लागतो. त्यावेळी रुग्णाला चिठ्ठीवर टोकन क्रमांक दिला जातो. रुग्ण उपचारासाठी रुग्णालयामध्ये आल्यानंतर एमआरडी क्रमांक सांगितला तरी त्यांना टोकन मिळते. ही चिठ्ठी हरविल्यास किंवा चिठ्ठीवरील शाई पुसल्यास रुग्णांना नवीन एमआरडी क्रमांक काढावा लागतो. त्यामुळे एकाच रुग्णाचे अनेक एमआरडी क्रमांक तयार होतात.

> वायसीएम रुग्णालयामध्ये गेल्या तीन वर्षांपासून हेल्थ कार्ड यंत्रणा बंद आहे. सध्या रुग्णालयामध्ये तपासण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना कागदावर टोकन क्रमांक दिले जात आहेत. तसेच, रुग्णांचा एमआरडी क्रमांक तयार केला जातो. त्यानुसार रुग्णावर पुढील उपचार सुरू केले जातात. रुग्णालयामध्ये डिजिटल आभा कार्ड (आयुष्मान भारत आरोग्य खाते) काढण्याचे नियोजन आहे. त्यामुळे निकषानुसार पात्र ठरणाऱ्या रुग्णांना केंद्र सरकारच्या आरोग्यविषयक योजनेचा फायदा मिळू शकेल.
>
> **- डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण रुग्णालय पदव्युत्तर संस्था, संत तुकारामनगर.**

### आता नव्याने देणार स्मार्ट आरोग्य कार्ड

**» महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली (एचएमआयएस) लागू केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्य डेटाचे एकत्रिकरण होईल. तसेच त्याचा संपूर्ण वैद्यकीय इतिहास ते ज्या रुग्णालयात भेट देतात, तेथे दिसणार आहे. रुग्णालये आणि दवाखाने यासाठी एक केंद्रीय डिजिटल प्रणाली सुरू केली जाणार आहे. त्यासाठी, रुग्णांना नवीन स्मार्ट आरोग्य कार्ड दिले जाणार आहेत.**

# पीसीईटीच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा

## 'तिफन २०२५' स्पर्धेत पीसीसीओईच्या 'टीम अ‍ॅब्युश'ला प्रथम पारितोषिक

**पिंपरी | प्रतिनिधी**

सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनिअर्स (एसएइ) इंडिया आणि जॉन डिअर इंडिया प्रा. लि. यांच्या संयुक्त सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या 'तिफन २०२५' या राष्ट्रीय कृषी यंत्रणा स्पर्धेत पीसीसीओईच्या 'टीम अ‍ॅब्युश'ने प्रथम क्रमांक पटकावून पीसीईटीच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

अहिल्यानगर मधील राहुरी कृषी विद्यापीठ येथे या स्पर्धेची अंतिम फेरी आणि बक्षीस वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. यावेळी देशभरातील ७४ नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध संघ, त्यांचे मार्गदर्शक प्राध्यापक आणि प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पीसीसीओईच्या 'टीम अ‍ॅब्युश'ने विकसित केलेल्या 'कृषिरथ ७.०' ने या स्पर्धेतील सर्व टप्प्यातील सर्व निकष पूर्ण करीत राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या टीमला महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे डीन डॉ. आर. डी. बनसोड, स्पर्धेचे संयोजक संदीप राजपूत, संचालक अभिजीत फडके, कॉर्पोरेट अफेअर्सचे संचालक मुकुल वर्शने यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र आणि एकूण एक लाख चाळीस हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा कृषी अभियांत्रिकी नवोपक्रमांवर आधारित असते. यावर्षी स्पर्धेचा विषय "स्वयंचलित मल्टी-वेजिटेबल ट्रान्सप्लांटर तयार करणे" हा होता.




सुमित चौगुले, उमेश बाराते, अनुराग नेवाळे, रोहित शिंदे, सुदर्शन काशिद, कौस्तुभ कोल्हापुरे, अहिल्या मेटकरी, प्रेरणा कोळेकर, प्रांजल गुजर, सर्वेश गाडेकर, पार्थ अवलकर आणि आदित्य गवळी यांनी विकसित केलेल्या 'कृषिरथ ७.०'ने संकल्पना विकास, प्रात्यक्षिक, चाचणी आणि सादरीकरण यामधील प्रत्येक टप्प्यावर उल्लेखनीय कामगिरी केली. मार्गदर्शन प्रा. ईशान साठोने यांनी केले. तांत्रिक मार्गदर्शन जॉन डीअर कंपनीच्या गौरी साळुंखे आणि अक्षता नागवडे यांनी केले. शेतातील प्रात्यक्षिकांसाठी अजय चौगुले यांनी साहाय्य केले. पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीळकंठ चोपडे, अधिष्ठाता डॉ. पद्माकर देशमुख, सह अधिष्ठाता डॉ. राहुल पाटील, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ. शीतलकुमार रवंदळे, रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभाग प्रमुख डॉ. नरेंद्र देवरे, मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. प्रवीण काळे, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे अशोक गाडेकर यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिल्यामुळे हे यश मिळाले.

### रोपलागवडीचे स्वयंचलित नियोजन

**» 'कृषिरथ ७.०' ही यंत्रणा वांगी, मिरची, टोमॅटो यांसारख्या विविध फळभाज्या व भाजीपाला पिकांसाठी सुसंगत आहे. यामध्ये रोपांची कार्यक्षमता ९० टक्क्यांपेक्षा जास्त रहाते. रोपांचे नुकसान अत्यंत कमी होते. रोपांची अचूकता, स्थिरता आणि उत्पादकता उच्च व्हावी यासाठी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक आणि हायड्रॉलिक नियंत्रण प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यंत्रामध्ये, रोपसंख्या मोजणी व रोपलागवडीचे स्वयंचलित नियोजन तसेच विविध सेन्सर व अभ्रक वापरून सुरक्षा व कार्यदक्षता सुनिश्चित करणारी प्रणाली समाविष्ट केली आहे. 'कृषिरथ ७.०' या यंत्रणेत शेतकऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च महत्त्व देण्यात आले आहे आणि हे आधुनिक कृषी अभियांत्रिकीतील उत्कृष्ट नमुना मानले जाते.**

# वाजेवाडीतील पूल गेला वाहून, संथगती कामाचा परिणाम

## नागरिकांनी बांधकाम विभाग आणि ठेकेदार जबाबदार असल्याचा ठपका ठेवला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

वाजेवाडी (ता. शिरुर) येथील वढू बुद्रुक ते चौफुला रस्त्याबाबत अनेक दिवसांपासून वेगवेगळ्या घटना घडत असताना दोन दिवसांपूर्वी येथे एका दुचाकीवर झाड कोसळले. रस्त्यावरील पुलाचा पूर्ण मुरुम भराव व भाग पाण्याने वाहून गेला. त्यामुळे वाहतूक पूर्ण बंद झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त करीत बांधकाम विभाग आणि संथगतीने काम करणारा ठेकेदार जबाबदार असल्याचा ठपका स्थानिकांनी ठेवला आहे.



वाजेवाडीसह परिसरात चार दिवसांपेक्षा अधिक काल संततधार पाऊस झाल्याने ओढे, नाले तुडुंब वाहत असताना सर्व पाणी येथील वढू बुद्रुक ते चौफुला रस्त्या लगतच्या ओढ्यातून वाहत आहेत. ओढ्यावरील मुरुमाच्या भरावाचा असलेला पूल वाहून गोठ्यात आणि घरात पाणी शिरले. वढू बुद्रुक ते चौफुलादरम्यानची वाहतूक ठप्प झाली आहे.

याला बांधकाम विभाग व लालफितीतील शासकीय कारभार जबाबदार असल्याचे सांगत स्थानिकांनी रोष व्यक्त केला आहे. मुसळधार पावसाने नागरिकांसह प्रशासनाची धांदल उडवली आहे. रस्त्यावरील पूल वाहून असताना यापूर्वी पुलाच्या खाली पाणी जाण्यासाठी चार ते पाच नळ्या होत्या. त्यातून पाणी वाहून जात होते. पण रस्त्याचे काम सुरू झाल्यावर त्यातील फक्त एक नळी पाणी वाहून जाण्यासाठी असल्याने मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी तुंबले.

नागरिकांच्या घरात, गोठ्यात पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले. भरत शिवले, एकनाथ शिवले यांच्या गोठ्यात तर सतीश शिवले, भरत शिवले, मोहन शिवले, बाळासाहेब साठे यांच्या घरात पाणी शिरले. किसन शिवले यांच्या शेतीचे नुकसान झाले. रस्ता बनवण्याचे काम अनेक दिवसांपासून बंद असून बाहेर लोखंडी सळया व मुरुमाच्या रस्त्यावरून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. शेतकरी आक्रमक होऊन ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यांनी केली आहे.

### ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करावी

**» वढू बुद्रुक ते चौफुला रस्त्याच्या ठेकेदाराने सहा महिन्यांपासून संथगतीने काम चालवले असून पुलाच्या नळ्या बंद करणे, मुरूमाचा भराव व्यवस्थित न भरणे नागरिकांच्या जीविताला धोका होईल हे लक्षात न घेता निकृष्ट दर्जाचे काम करीत असून या कामाची वरिष्ठांनी तातडीने पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देत ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सोनेश शिवले यांनी केली आहे.**

### योग्य तपास करून कारवाई करणार

**» वढू बुद्रुक ते चौफुला रस्त्यावरील मुरुमाचा भराव अतिवृष्टीमुळे वाहून गेला असून सदर ठेकेदाराला अत्यावश्यक सूचना दिल्या आहेत, संबंधित कामाच्या बाबतीत चौकशी करण्यात येणार असून रस्त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने सूचना फलक लावण्याच्या व योग्य काळजी घेण्याचे ठेकेदाराला सांगितले. घटनेचा तपास करुन त्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता रणजीत दाईंगडे यांनी सांगितले.**

# पालाखी मार्गाची कामे लवकरच पूर्ण होणार

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी : सुकलवाडीतील पालखी तळाची केली पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील वाल्हे जवळील सुकलवाडी फाट्याशेजारी प्रांगणामध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा येत्या 25 जून रोजी विसावणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पालखी सोहळा मुक्कामाची पूर्वतयारी म्हणून जिल्हाधिकारी, आळंदी देवस्थानचे विश्वस्त, पदाधिकारीवर्ग, पुरंदर प्रशासनाकडून पालखीतळाची पहाणी करण्यात आली.

यावेळी आढळलेल्या त्रुटींबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी, पालखी मार्गातील बहुतांश कामे लवकरच पर्यंत पूर्ण होतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

याप्रसंगी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, उपविभाग पोलीस अधिकारी तानाजी बरडे,पुरंदरच्या गटविकास अधिकारी शेळके, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग स्वाती दहिवाल,जेजुरी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाघचौरे, मंडल अधिकारी भारतकुमार मिसे, तलाठी शरद लोंढे, वाल्हे उपसरपंच साम्राज्ञी लंबाते, वागदरवाडी सरपंच सुनील पवार, सुकलवाडी सरपंच संदेश पवार, उद्योजक राहुल यादव, ग्रामपंचायत सदस्य सागर भुजबळ, तेजस दुर्गाडे, मयुरी भुजबळ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



जेजुरीच्या पालखी तळावर इमारत बांधकामांचा राडारोडा टाकण्यात येतो , त्यामुळे तळाची दुरवस्था होते या तळांची देखभाल करण्यासाठी कायमस्वरूपी रखवालदार नियुक्त करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ रत्नपारखी यांचेसह पत्रकारांनी यावेळी केली .

ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे विविध समस्या निवेदनाद्वारे मांडल्या. जिल्हाधिकारी डुडी यांनी यावेळी संबंधितांना त्या त्या कामाच्या सूचना केल्या आहेत. पालखी सोहळा मुक्कामाची पूर्वतयारी म्हणून जिल्हाधिकारी, आळंदी देवस्थानचे विश्वस्त, पदाधिकारीवर्ग, पुरंदर प्रशासनाकडून पालखीतळाची पहाणी करण्यात आली.

### पालखी तळावर रखवालदार हवा

**» जेजुरी – सासवड ते नीरा राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक असलेली तसेच अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात यावीत तसेच जेजुरीच्या पालखी तळावर इमारत बांधकामांचा राडारोडा टाकण्यात येतो , त्यामुळे तळाची दुरवस्था होते या तळांची देखभाल करण्यासाठी कायमस्वरूपी रखवालदार नियुक्त करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ रत्नपारखी यांचेसह पत्रकारांनी यावेळी केली .**

### ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे या मागण्या केल्या

**» भव्य-दिव्य पालखी तळासाठी असलेल्या दोन स्वागत कमानी पैकी एक स्वागत कमान भुयारीमार्गामुळे वापरात येत नसल्याने नवीन स्वागत कमान उभारण्यात यावी.**

**» पालखी तळासाठी भरीव निधीची तरतूद करून पालखीतळाचे सुशोभीकरण करण्यात यावे.**

**» पर्यायी पालखी महामार्गाचे सद्यःस्थितीत सुरू असलेले काम लवकर पूर्ण करण्यात यावे.**

**» गावातील अतिक्रमणे हटविवित रस्ता रुंदीकरण करण्यात यावे.**

**» रेल्वेचा भुयारीमार्ग धोकादायक झाला संरक्षण भिंती पालखी सोहळ्याच्या आगोदर बांधावी.**